जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

21 NOV 2020 पुढारी

# शहीद जोंधळे यांच्या कुटुंबातील पाल्याचा विद्यापीठातर्फे शैक्षणिक खर्च

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडून कुटुंबीयांचे सांत्वन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शहीद ऋषीकेश जोंधळे यांच्या कुटुंबातील पाल्याने शिवाजी विद्यापीठाच्या अधिविभागात अगर संलग्नित महाविद्यालयात प्रवेश घेतल्यास त्याचा संपूर्ण शैक्षणिक खर्च विद्यापीठाच्या वतीने करण्यात येईल, अशी ग्वाही कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिली.



**कोल्हापूर : शहीद ऋषीकेश जोंधळे यांचे वडील रामचंद्र जोंधळे यांचे सांत्वन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. आर. व्ही. गुरव.**

कुलगुरू डॉ. शिर्के यांनी बहिरेवाडी (ता. आजरा) येथील शहीद ऋषीकेश जोंधळे यांच्या घरी भेट देऊन त्यांचे वडील रामचंद्र हरी जोंधळे व कुटुंबीयांचे सांत्वन केले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव उपस्थित होते. कुलगुरू डॉ. शिर्के यांनी शिवाजी विद्यापीठ परिवाराच्या वतीने शहीद जोंधळे यांना श्रद्धांजली वाहिली. विद्यापीठातर्फे 'शहीद लष्करी, निमलष्करी जवान आणि शहीद पोलिस' यांच्या अपत्यांना सर्व शैक्षणिक सुविधा मोफत उपलब्ध करून देण्यात येत असल्याचे सांगितले. त्यानुसार शहीद जोंधळे यांच्या कुटुंबातील पाल्यास संलग्नित महाविद्यालयीन व विद्यापीठीय शैक्षणिक खर्च देण्यात येईल, असेही ते म्हणाले. विद्यापीठाच्या वतीने तसे पत्रही कुलगुरूंनी जोंधळे यांच्याकडे सुपूर्द केले.

21 NOV 2020
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शहीद जोंधळेंच्या कुटुंबातील पाल्यांना विद्यापीठतर्फे सुविधा

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची ग्वाही

कोल्हापूर : प्रतिनिधी

शहीद ऋषीकेश जोंधळे यांच्या कुटुंबातील पाल्याने शिवाजी विद्यापीठाच्या अधिविभागात अगर संलग्नित महाविद्यालयात प्रवेश घेतल्यास त्याचा संपूर्ण शैक्षणिक खर्च विद्यापीठातर्फे करण्यात येईल, अशी ग्वाही कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिली. कुलगुरू डॉ. शिर्के यांनी गुरुवारी सायंकाळी बहिरेवाडी (ता. आजरा) येथील शहीद जोंधळे यांच्या घरी भेट देऊन त्यांचे वडील रामचंद्र जोंधळे आणि कुटुंबीयांचे सांत्वन केले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिर्के यांनी विद्यापीठ परिवाराच्या वतीने शहीद जोंधळे यांना श्रद्धांजली वाहिली. शिवाजी विद्यापीठातर्फे 'शहीद लष्करी, निमलष्करी जवान आणि शहीद पोलीस' यांच्या अपत्यांना सर्व शैक्षणिक सुविधा मोफत उपलब्ध करून देण्यात येत असल्याचे सांगितले. जोंधळे यांच्या कुटुंबातील पाल्यासही महाविद्यालयीन व विद्यापीठीय शैक्षणिक खर्च देण्यात येईल. विद्यापीठाच्या वतीने तसे पत्रही कुलगुरूंनी जोंधळे यांच्याकडे सुपूर्द केले.



शहीद ऋषीकेश जोंधळे यांचे वडील रामचंद्र जोंधळे यांचे सांत्वन करताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर व डॉ. आर. व्ही. गुरव.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 NOV 2020
लोकमत

# शिवाजी विद्यापीठ करणार शहीद जोंधळे यांच्या कुटुंबातील पाल्याचा शैक्षणिक खर्च

■ लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शहीद ऋषिकेश जोंधळे यांच्या कुटुंबातील पाल्याने शिवाजी विद्यापीठाच्या अधिविभागात किंवा संलग्नित महाविद्यालयात प्रवेश घेतल्यास त्याचा संपूर्ण शैक्षणिक खर्च विद्यापीठाच्या वतीने करण्यात येईल, अशी ग्वाही कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिली.



शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी गुरुवारी शहीद ऋषिकेश जोंधळे यांचे वडील रामचंद्र जोंधळे यांचे सांत्वन केले. यावेळी शेजारी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. आर. व्ही. गुरव उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिर्के यांनी गुरुवारी (दि. १९) सायंकाळी बहिरेवाडी (ता. आजरा) येथील शहीद ऋषिकेश जोंधळे यांच्या घरी भेट देऊन त्यांचे वडील रामचंद्र हरी जोंधळे व कुटुंबीयांचे सांत्वन केले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिर्के यांनी शिवाजी विद्यापीठ परिवाराच्या वतीने शहीद जोंधळे यांना श्रद्धांजली वाहिली. त्याचप्रमाणे विद्यापीठातर्फे 'शहीद लष्करी, निमलष्करी जवान आणि शहीद पोलीस' यांच्या अपत्यांना सर्व शैक्षणिक सुविधा मोफत उपलब्ध करून देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. त्यानुसार शहीद जोंधळे यांच्या कुटुंबातील पाल्यासही संलग्नित महाविद्यालयीन व विद्यापीठीय शैक्षणिक खर्च देण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. विद्यापीठाच्या वतीने तसे पत्रही कुलगुरू डॉ. शिर्के यांनी रामचंद्र जोंधळे यांच्याकडे सुपूर्द केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

21 NOV 2020

तरूण भारत

# विद्यापीठ करणार हुतात्मा जोंधळे कुटुंबातील पाल्याचा शैक्षणिक खर्च

कोल्हापूर

हुतात्मा जवान ऋषिकेश जोंधळे यांच्या कुटुंबातील पाल्याने शिवाजी विद्यापीठाच्या अधिविभागात अगर संलग्नित महाविद्यालयात प्रवेश घेतल्यास त्याचा संपूर्ण शैक्षणिक खर्च विद्यापीठाच्या वतीने करण्यात येईल, अशी ग्वाही कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिली. कुलगुरू डॉ. शिर्के यांनी गुरुवारी सायंकाळी बहिरेवाडी (ता. आजरा) येथील शहीद ऋषिकेश जोंधळे यांच्या कुटूंबियांची घरी जावून भेट घेतली. त्यांचे वडील रामचंद्र हरी जोंधळे व कुटुंबियांचे सांत्वन केले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. शिर्के यांनी शिवाजी विद्यापीठ परिवाराच्या वतीने शहीद जोंधळे यांना श्रद्धांजली वाहिली. त्याचप्रमाणे शिवाजी विद्यापीठातर्फे 'शहीद लष्करी, निमलष्करी जवान आणि शहीद पोलीस' यांच्या अपत्यांना सर्व शैक्षणिक सुविधा मोफत उपलब्ध करून देण्यात येत असल्याचे सांगितले. त्यानुसार हुतात्मा जवान जोंधळे यांच्या कुटुंबातील पाल्यासही संलग्नित महाविद्यालयीन व विद्यापीठीय शैक्षणिक खर्च देण्यात येईल, असे सांगितले. विद्यापीठाच्या वतीने तसे पत्रही कुलगुरूंनी जोंधळे यांच्याकडे सुपूर्द केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 NOV 2020
पुढारी

# पदव्युत्तर अभ्यासक्रम प्रवेश परीक्षेसाठी ५ हजार विद्यार्थी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठामार्फत पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठीच्या प्रवेश परीक्षा विविध परीक्षा केंद्रांवर सुरळीतपणे पार पडल्या. परीक्षेसाठी ६ हजार २५८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली. यापैकी ५ हजार १०२ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.

विद्यापीठाच्या वतीने विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षा घेण्यात आल्या. यात एम.एस्सी. केमेस्ट्री, एम. एस्सी. गणित, मायक्रोबायोलॉजी, एम. एस्सी. फार्मास्युटिकल, एम.एस्सी.



इंडस्ट्रीयल मायक्रो बायोलॉजी अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा झाल्या. उपस्थितीचे प्रमाण ८१.५३ टक्के होते. परीक्षा विद्यापीठ व संलग्रित महाविद्यालयातील परीक्षा केंद्र तसेच पुणे, सोलापूर व बेळगाव येथील परीक्षा केंद्रांवर सुरळीतपणे पार पडली, अशी माहिती परीक्षा मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 NOV 2020

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठातर्फे प्रवेश परीक्षा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठातर्फे पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी शुक्रवारी प्रवेश परीक्षा घेण्यात आल्या. या परीक्षेसाठी ६ हजार २५८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ५ हजार १०२ विद्यार्थी परीक्षेस उपस्थित राहिले होते. यामध्ये प्रामुख्याने एम.एस्सी. केमिस्ट्री (इनॉरगॅनिक/ऑरगॅनिक/

फिजिकल/अनॅलॅटिकल/ इंडस्ट्रियल केमिस्ट्री आणि अप्लाईड केमिस्ट्री), एम.एस्सी. मॅथेमॅटिक्स, एम.एस्सी. मायक्रोबायोलॉजी, एम. एस्सी. फार्मासिटिकल्स मायक्रोबायोलॉजी, एम.एस्सी. इंडस्ट्रियल मायक्रोबायोलॉजी या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश परीक्षा झाल्या. या परीक्षा विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालये येथील परीक्षा केंद्रांवर तसेच पुणे, सोलापूर व बेळगाव येथील परीक्षा केंद्रांवर सुरळीतपणे पार पडल्या, अशी माहिती परीक्षा मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

21 NOV 2020

लोकमत

# ५१०२ विद्यार्थ्यांनी दिली प्रवेश परीक्षा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील विविध पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी शुक्रवारी ५१०२ विद्यार्थ्यांनी ऑफलाईन पद्धतीने प्रवेश परीक्षा दिली. विद्यापीठ आणि संलग्नित महाविद्यालयांसह पुणे, सोलापूर, बेळगाव येथील केंद्रांवर परीक्षा घेण्यात आली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 NOV 2020
पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात इंदिरा गांधी यांची जयंती

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यात आले. त्यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. हिंदी अधिविभागाचे प्रमुख डॉ. अर्जुन चव्हाण यांनी सर्वांना एकात्मतेची शपथ दिली. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय युवा योजना समन्वयक अभय जायभाये, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 NOV 2020
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात इंदिरा गांधींना अभिवादन

कोल्हापूर : भारताच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या जयंतीनिमित्त गुरुवारी शिवाजी विद्यापीठात अभिवादन करण्यात आले. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या हस्ते इंदिरा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी हिंदी अधिविभागाचे प्रमुख डॉ. अर्जुन चव्हाण यांनी सर्वांना एकात्मतेची शपथ दिली. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही.टी. पाटील, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय येवा योजना समन्यवक अभय जायभाये यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.